लोकमत सिंधुदुर्ग, बुधवार, १७ सप्टेंबर २०१४ ३

# दोडामार्गात आपद्ग्रस्तांसाठी मदत फेरी

कसई दोडामार्ग : दोडामार्ग येथील नवनिर्माण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने माळीण आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठी निधी जमा करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची दोडामार्ग बाजारपेठेमधून मदत फेरी काढण्यात आली.

विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या मदत फेरीस बाजारपेठेतील भाजीविक्रेते, दुकानदार, गाडीवाले आदी सर्व स्तरातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. ही मदतफेरी यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख डॉ. एस. यू. दरेकर, प्रा. आर. ए. मोरे, प्रा. एस. एन. खडपकर, प्रा. डी. वाय. बर्वे, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे, प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे, प्रा. एस. एल. जाधव, प्रा. एम. टी. बेग, प्रा. एस. एस. पाडगावकर, प्रा. पी. एन. ढेपे यांनी सहकार्य केले. (वार्ताहर)

शिरीष नाईक




नवनिर्माण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने माळीण आपद्ग्रस्तांसाठी निधी जमा करण्यासाठी दोडामार्ग बाजारपेठेतून मदत फेरी काढण्यात आली.